नांदेड एक्स्प्रेस दि. २१/०९/२०२२

# नायगाव पोलिसांकडून १९ हजारांचा गुटखा जप्त

**नायगावबाजार (प्रतिनिधी) :** नायगाव पोलिसांनी शहरातील हु.पानसरेनगर भागातील प्रख्यात साईबाबा मंदिर परिसरात असलेल्या एका घरावर धाड मारली. या धाडीत विविध कंपन्याचा १९ हजार रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. गुटखाविक्रेता यादव कोकुलवार यास पोलिसांनी अटक करुन गुन्हा दाखल केला आहे.

नायगाव शहरातील काही मंडळी मोठ्या प्रमाणात ठोक व किरकोळ गुटखा विक्रीचा धंदा करतात.

साईबाबा मंदिर भागात रहाणाऱ्या एका घरात मोठ्या प्रमाणात गुटखा असल्याची गुप्त माहिती पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांना मिळाली. यानुसार यांनी एक पथक तयार करुन सदर ठिकाणी धाड टाकली. या धाडीत पोलिसांना १९ हजार रुपयांचा विविध कंपन्याचा गुटखा सापडला. या गुटख्याची काळ्या बाजारात पनास हजार रुपयांच्यावर किंमत आहे.

पोहेकॉ विलास मुस्तापुरे यांच्या तक्रारीवरून आरोपी यादव कोकुलवार यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक शिंदे हे करीत आहेत.

नायगाव शहरात भल्या पहाटे दुचाकी व चारचाकी वाहनातून गुटखा विक्र करणारी टोळी सक्रीय झाली असून, नायगाव पोलिसांच्या कार्यवाही या व्यवसायाला काही प्रमाणात प्रतिबंध बसणार आहे.

दै. सकाळ दि. २१/०९/२०२२.

दै. सकाळ दि. २१/०९/२०२२

# चोवीस तासांत चोरीचा गुन्हा उघड

## शिवाजीनगर ठाणे; मुद्देमालासह दोन आरोपी अटक

**नांदेड, ता. २० (बातमीदार) :** शिवाजीनगर पोलिस ठाण्यातील गुन्हे शोध पथकाने २४ तासामध्ये जबरी चोरीचा गुन्हा उघड केला आहे. या प्रकरणात मुद्देमाल जप्त करून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

शिवाजीनगर येथील सोमेश नागेश शेट्टी यांचा अल्पवयीन मेव्हणा पावडेवाडी नाका रस्त्यावरून रविवारी (ता. १८) रात्री सातच्या सुमारास जात होता. त्यावेळी दुचाकीवरून तीन जण आले आणि त्यांनी त्यांच्या हातातील १५ हजाराचे घड्याळ जबरीने हिसकाऊन चोरून नेले. याबाबत शिवाजीनगर ... दाखल करण्यात ...

आरोपी निष्पन्न करून आकाश गजाजन गनगोपलवाड (वय २१, रा. पुष्पनगर, नांदेड) आणि सुधन गौतम कसबे (वय २०, रा. सावित्रीबाई फुले नगर, नांदेड) या दोघांना तिरूमला हॉस्पीटलसमोरून ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांच्याकडील चोरून नेलेले घड्याळ तसेच गुन्ह्यात वापरलेली एक लाखाची दुचाकी असा मुद्देमाल जप्त केला आहे. ठाण्याचे पोलिस निरीक्षक डॉ. नितीश काशीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पथकातील सहायक पोलिस निरीक्षक रवी वाहुळे, फौजदार मिलिंद सोनकांबळे, अंमलदार इब्राहिम शेख, दिलीप राठोड, रवीशंकर बामणे, देवीसिंग सिंगल, अझहर शेख, दत्ता वडजे ...